
# ७) अम्बपाली थेरी

**प्रस्तावना**

खुद्दक निकायातील थेरीगाथा या ग्रंथातून हा पद्य उतारा घेतला गेलेला आहे. आम्रपाली अतिशय सुंदर व देखणी होती. तारुण्यात पदार्पण केल्यावर ती इतकी देखणी दिसू लागली, की तिच्या प्राप्तीसाठी अनेक राजपुत्रात स्पर्धा निर्माण झाली. शेवटी सर्वांचीच म्हणून ती गणिका झाली. नंतर तथागताचा उपदेश ऐकूण ती विरक्त झाली व तिने प्रवज्जा घेतली. एकेकाळी ती आपल्या सौंदर्याने सर्वांना आकर्षित करणारी होती; परंतु पुढे त्यातील नश्वरता तिला उमगली. 'पूर्वी मी कशी होते व आता कशी झाली आहे' याचे वर्णन करताना तिने प्रस्तुतच्या गाथा म्हटल्या आहेत. पालिमधील अलंकारीत शैलीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेच शरीर सौदर्य नश्वर आहे, याचा साक्षात्कार एका गणिकेला होणे यातील विरोधाभासही आहे.

आम्रपाली तारुण्याची व म्हातारपणाची स्वानुभवावरून तुलना करीत असून जिला सौंदर्यसंपन्नता प्राप्त झाली होती, तिलाच सौंदर्याच्या अनित्यतेचा व क्षणभंगुरतेचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला. तो अनुभव मन संतुलनाला पोषक ठरणारा वाटतो.



''काळका भमरवण्णसदिसा, वेल्लितग्गा मम मुद्धजा अहुं।
ते जराय साणवाकसदिसा, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१।।

''वासितो'व सुरभी करण्डको, पुप्फपूर मम उत्तमङ्गजो।
तं जराय सलोमगन्धिकं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।२।।

''काननं व सहितं सुरोपितं, कोच्छसूचिविचितग्गसोभितं।
तं जराय विरलं तहिं तहिं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।३।।

''कण्हखन्धकसुवण्णमण्डितं, सोभते सुवेणीहिअलङ्कतं।
तं जराय खलितं सिरं कतं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।४।।

''चित्तकारसुकता व लेखिता, सोभते सुभमुका पुरे मम।
ता जराय वलिहिपलम्बिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।५।।

''भस्सरा सुरुचिरा यथा मणी,नेत्तहेसुमभिनीलमायता।
ते जरायभिहता न सोभते, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।६।।

''सण्हतुङ्गसदिसी च नासिका, सोभते सुअभियोब्बनं पति।
सा जराय उपकूलिता विय, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।७।।

''कङ्कणं व सुकतं सुनिट्ठितं, सोभते सुमम कण्णपाळियो।
ता जराय वलिभिप्पलम्बिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।८।।

''पत्तलीमकुलवण्णसादिसा, सोभते सुदन्ता पुरे मम।
ते जराय खण्डिता चासिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।९।।

''काननम्हि वनसण्डचारिनी, कोकिलाव मधुरं निकूजिहं।
तं जराय खलितं तहिं तहिं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१०।।

''सण्हकम्बुरिव सुप्पमज्जिता, सोभते सुगीवा पुरे मम।
सा जराय भग्गा विनामिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।११।।

''वट्टपलिघसदिसोपमा उभो, सोभते सुबाहा पुरे मम।
ता जराय यथ पाटली दुब्बलिका, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१२।।

''सण्हमुद्दिकासुवण्णमण्डिता, सोभते सुहत्था पुरे मम।
ते जराय यथा मूलमूलिका, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१३।।

''कञ्चनस्स फलकं व सुम्मट्ठं, सोभते सुकायो पुरे मम।
सो वलीहि सुखुमाहि ओततो, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१४।।

''एदिसो अहु अयं समुस्सयो, जज्जरो बहुदुक्खानमालयो।
सो पलेपपतितो जराघरो, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१५।।

**(संदर्भ–थेरीगाथा)**



## शब्दार्थ

**भमरवण्णसदिसा (वि.)**– भुंग्याच्या रंगासारखे
**वेल्लितग्गा (वि.)**– कुरळे
**सच्चवादिवचन (नपु.)**– सत्य बोलणाऱ्या बुद्धाचे वचन
**अनञ्ञथा (वि.)**– खरे (खोटे ठरत नाही असे)
**पुप्फपूर– (नपु.)** फुलांनी माळलेल्या
**उत्तमङ्गजो(नपु.)**– डोक्यावर वाढणारे केस
**सलोमगन्धिक (वि.)**– दुर्गंधीयुक्त केस
**सोभते (नपु.)**– सुंदर दिसणे
**चित्तकारसुकतोव (पु.)**– चित्रकाराने रंगविलेल्या
**भमुका (स्त्री.)**– भुवया
**वलि (वि.)** – सुरकुत्या
**भस्सरा (वि.)**– प्रकाशमान
**नासिका (स्त्री.)**– नाक
**अभियोब्बन (पु.)**– तरुण
**उपकुलिता (स्त्री.)**– संकुचित
**कण्णपाळियो (वि.)**– कानाच्या पाळ्या
**दन्ता (नपु.)**– दात
**चासित(वि.)**– काळे (जे पांढरे नाहीत असे)
**वनसण्डचारिनी (स्त्री.)**– वनात राहणारी
**मधुरं (वि.)**– गोड आवाज
**निकूजिहं (नपु.)**– आवाज, पक्षांची चीवचीव
**गीवा (स्त्री.)**– मान, गळा
**बाह (पु .)**– बाहु (दंड )
**हत्थ (पु.)**– हात
**बहुदुक्खानमालयो (वि.)**– नाना दुःखाचे आगार
**जराय (वि.)**– म्हातारपणामुळे

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) अम्बपालीचे केस कसे होते?
२) अम्बपालीचे चित्रकाराने कोरल्यासारखे काय होते?
३) पूर्वीची अम्बपालीची मान कशी होती?
४) सत्यवादी बुद्धाचे वचन कसे ठरत नाही?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) सच्चवादिवचनं अनञ्ञथा।
२) तं जराय अविरलं तहिं तहिं।
३) सोभते सु गीवा पुरे ममं।
४) सोभते सुअकायो पूरे ममं।

### ३. रूपे ओळखा.

१) जराय २) कोकिला.
३) लम्बन्ति ४) भमुका

### ४. संधी करा.

१) अन+ अञ्ञथा २) उत्तम + अङ्गजो

### ५. माध्यम भाषेत अर्थ लिहा.

१) सलोमगन्धिकं २) कायो
३) गीवा ४) हत्था


### ६. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) काननम्हि वनसण्डचारिनी कोकिलाव ........... निकूजिहं। (अमधुर/मधुर)
२) ते जराय साणवाकसदिसा,सच्चवादिवचनं ...........। (नञ्ञथा/अनञ्ञथा)
३) ...........अहु अयं समुस्सयो। (तदिसो/एदिसो)
४) सोभते...........पति। (सुयोब्बनं/सुअभियोब्बनं)

### ७. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) काळका | अ) सोभते सुदन्ता |
| २) भस्सरासुरुचिरा | ब) कोकिलाव |
| ३) सण्हतुङ्गसदिसी | क) भमरवण्णसदिसा |
| ४) पत्तलीमकुलवण्णासदिसा | ड) यथा मणी |
| | इ) च नासिका |

### ८. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




### ९. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.

अम्बपालीने सौंदर्याची अनित्यता कशा प्रकारे सांगितली आहे?